**संक्षिप्त**




पूरग्रस्तांसाठी मदतनिधी संकलन फेरी काढताना हळबे महाविद्यालयातील विद्यार्थी. (छाया : जनार्दन परब)

# हळबे महाविद्यालयातर्फे पूरग्रस्तांसाठी मदतफेरी

**दोडामार्ग (वार्ताहर) :** गेल्या महिन्यात आलेल्या प्रचंड महापुराने महाराष्ट्रातील कोल्हापूर, सांगली, सिंधुदुर्ग जिल्ह्याबरोबरच इतर जिल्ह्यातही प्रचंड आर्थिक नुकसान झाले. अनेक गावे पाण्याखाली गेल्यामुळे काहींचे संसार उद्ध्वस्त झाले. या पूरग्रस्तांच्या मदतीसाठी लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयाच्या एन.एस.एस. आजीवन अध्ययन व विस्तार व एन.सी.सी. विभागाच्या विद्यार्थ्यांनी दोडामार्ग शहरातून मदत निधी संकलन फेरी काढली. दोडामार्ग शहरातील व्यापारी, दुकानदार, फेरीवाले यांनी सढळ हाताने मदत करून माणुसकीचे नाते जपले. या सर्वांचे आभार व्यक्त करून प्राचार्य डॉ. एस. यु. दरेकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या मदतफेरी मध्ये सर्व प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. प्राचार्य डॉ. दरेकर यांनी सर्व विद्यार्थी व उपस्थितांचे आभार मानले.